# पुरवठादाराची आचारसंहिता

फ्रूट ऑफ द लूम आणि आमच्या संलग्न कंपन्यांमध्ये ("एफओटीएल"), आम्ही व्यवसाय नैतिकतेच्या उच्चतम मानकांनुसार आणि मानवाधिकार आणि पर्यावरणाबद्दल आदर राखून व्यवसाय करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आमची उत्पादने पुरवणाऱ्या सर्व सुविधांकडून आम्हाला त्याच वचनबद्धतेची गरज आहे, यामध्ये पुढीलचा समावेश आहे परंतु इतकेच मर्यादित नाही, कंत्राटदार, परवानाधारक आणि इतर नियुक्त व्यवसाय भागीदार (एकत्रितपणे “पुरवठादार” म्हणून संबोधित). ही पुरवठादार आचारसंहिता अशी मानके दर्शवते ज्याद्वारे आम्ही सुनिश्चित करतो कि पुरवठादारांनी वचनबद्धतेची पूर्तता केली आहे आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटना मूलभूत ठरावांतील तत्त्वे आणि फेअर लेबर असोसिएशन वर्कप्लेसच्या आचारसंहितेतील तत्त्वे याद्वारे मार्गदर्शन केले जाते.

***<u>लोक-केंद्रित</u>***

<u>रोजगार नातेसंबंध</u>: पुरवठादार कामगारांचा आदर करणाऱ्या रोजगाराच्या नियम व अटींचा स्वीकार करतील आणि किमान, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय श्रम आणि सामाजिक सुरक्षा कायद्यांनुसार आणि नियमनांनुसार त्यांच्या अधिकारांचे रक्षण करतील.

<u>आरोग्य आणि सुरक्षितता</u>: पुरवठादारांच्या कार्यांमधून उद्भवणाऱ्या अपघात आणि जखमा टाळण्यासाठी पुरवठादार एक सुरक्षित आणि निरोगी कार्यस्थळ रचना प्रदान करतील. पुरवठादारांच्या मालकीची किंवा ऑपरेट केलेल्या डॉर्मिटरीजसह पुरवठादारांच्या सुविधेतील स्थिती सुरक्षित आणि स्वच्छ असणे आणि सुरक्षितता आणि आरोग्य संबंधित सर्व लागू कायद्यांचे आणि नियमांचे पालन होईल किंवा त्यापेक्षा जास्त असतील अशा असणे आवश्यक आहे. कामगारांना त्यांची कामे सुरक्षितपणे करण्यासाठी प्रशिक्षित आणि सुसज्ज करणे आवश्यक आहे.

<u>बाल मजुरी</u>: पुरवठादार हे शाळेसाठीचे स्थानिक अनिवार्य वय किंवा लागू कायदेशीर नोकरीच्या वयानुसार उल्लंघन करून व्यक्तींची नियुक्ती करणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत, पुरवठादार हे जाहिरात किंवा माध्यमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या बाल कलाकार किंवा मॉडेल वगळता, 15 वर्षाखालील कामगारांना नियुक्त करणार नाहीत, आणि ते ही केवळ बाल मजुरी नियमांच्या अनुसारच.

<u>सक्तीची मजुरी</u>: पुरवठादार कारागृहातील मजुरी, करारबद्ध किंवा गुलामी मजुरी, किंवा बंधनकारक मजुरी यांच्या समावेशासह परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही अशा, सक्तीच्या मजुरीचा वापर करणार नाहीत. पुरवठादार मानवी तस्करीमध्ये सुविधा वापरल्या जाणार नाहीत याची खात्री करण्यासाठी उपायांचा अवलंब करतील आणि अशा पद्धतींसाठी त्यांच्या पुरवठा साखळीचे परीक्षण करतील.

<u>छळवणूक किंवा गैरवर्तन</u>: पुरवठादारांनी सर्व कर्मचाऱ्यांना आदर आणि सन्मानाने वागवलेच पाहिजे. कोणत्याही कामगार कोणत्याही शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा मौखिक छळवणूक किंवा गैरवापराला अधीन नसल्याचे सुनिश्चित करण्यासाठी पुरवठादारांकडे प्रक्रिया यथायावत असतील.

<u>भेदभाव नसणे</u>: लिंग, वंश, धर्म, वय, अपंगत्व, लैंगिक अभिमुखता, राष्ट्रीयत्व आणि संघटनेशी संबंध, राजकीय मत, सामाजिक गट किंवा जातीय मूळ यांच्या आधारावर भर्ती, भरपाई, प्रगती, शिस्त, समाप्ती किंवा सेवानिवृत्ती यासह पुरवठादार नोकरीमध्ये भेदभाव करणार नाहीत.

<u>कामाचे तास</u>: पुरवठादारांनी कामगारांकडून लागू कायद्याने परवानगी दिलेल्या नियमित आणि ओव्हरटाईमच्या तासांपेक्षा अधिक काम करून घेता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत, नियमित कामाचे आठवडे 48 तासांपेक्षा जास्त नसतील आणि दर सात दिवसांच्या कालावधीत कामगारांना किमान 24 सलग तास विश्रांतीची परवानगी दिली जाईल. सर्व ओव्हरटाईम काम सममूल्य असेल. पुरवठादार नियमितपणे ओव्हरटाईमची विनंती करणार नाहीत आणि एका प्रीमियम दराला ओव्हरटाईम कामाची भरपाई करतील. अपवादात्मक परिस्थितीव्यतिरिक्त, एका आठवड्यात नियमित आणि ओव्हरटाईम तासांची बेरीज 60 तासांपेक्षा जास्त नसेल.

<u>भरपाई</u>: कामगारांना आवश्यक असलेल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि काही विवेकपूर्ण उत्पन्न प्रदान करण्यासाठीचा भरपाई पुरवेल यासाठी पुरेसा असेल अशा नियमित कामाच्या आठवड्याचा प्रत्येक कामगाराला अधिकार आहे. पुरवठादार निदान किमान वेतन किंवा योग्य असे वर्तमान वेतन, जे उच्च असेल ते देतील, वेतनाच्या सर्व कायदेशीर आवश्यकतांचे पालन करतील आणि कायद्याद्वारे किंवा कराराद्वारे आवश्यक असलेले कोणतेही फायदे प्रदान करतील. जेथे भरपाई कामगारांच्या मूलभूत गरजा पूर्ण करीत नाही आणि काही विवेकाधीन कमाई देत नाही, तिथे पुरवठादार योग्य कारवाई करतील, ज्यामुळे मुबलक भरपाईचे प्रमाण उत्तरोतर पूर्ण केले जाईल.

<u>संघटना करण्याचे स्वातंत्र्य आणि सामूहिक सौदा</u>: पुरवठादारांनी कामगारांच्या संघटना करण्याचे स्वातंत्र्य आणि सामूहिक सौदा यासाठीचे अधिकार ओळखून त्यांचा आदर केलाच पाहिजे.

***<u>ग्रह-जागरुक</u>***

पुरवठादार त्यांच्या कार्यांचा वातावरणावर होत असलेला नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी जबाबदार उपायांचा अवलंब करतील. कमीतकमी, हे आवश्यक आहे की पुरवठादार घातक पदार्थांचा योग्य संचय आणि विल्हेवाट लावण्याच्या समावेशासह पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या स्थानिक आणि लागू असलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करतील, आणि असा व्यवसाय करण्याचा प्रयत्न करतील ज्याने ऊर्जा वापर आणि कचरा कमी होईल, नैसर्गिक स्त्रोतांच्या वापराला चालना मिळेल, आणि जास्तीत जास्त पुनर्निर्माण होईल.

***<u>उत्पादन सत्यता</u>***

<u>कायद्याचे अनुपालन</u>: या आचारसंहितेच्या आवश्यकतांची पूर्तता करण्याव्यतिरिक्त, पुरवठादार त्यांच्या कार्यांना लागू असलेल्या इतर सर्व कायदे, नियम आणि तहांचे पालन करतील.

<u>व्यवसाय नैतिकता</u>: पुरवठादारांकडून भ्रष्टाचार, खंडणी, अपहार किंवा कोणत्याही स्वरुपात उत्पादन किंवा सामग्री स्रोतांचा अपलाप कठोरपणे प्रतिबंधित आहे. या प्रतिबंधामध्ये अवाजवी किंवा अयोग्य फायद्याच्या बदल्यात लाच देणे किंवा स्वीकारणे आणि विनंती केल्यावर कच्च्या मालाचे स्रोत उघड करण्यात अयशस्वी होणे समाविष्ट आहे परंतु इतकेच ,मर्यादित नाही. या निषिद्धतेच्या उल्लंघनामुळे एफओटीएल द्वारे पुरवठादाराचे तात्काळ निलंबन होऊ शकते आणि पुरवठादाराला कायदेशीर कारवाईच्या अधीन जावे लागू शकते.

<u>उप-कंत्राटदार</u>: पुरवठादार एफओटीएलच्या उत्पादनांच्या किंवा घटकांच्या निर्माणामध्ये एफओटीएलच्या पूर्व लिखित मंजूरीशिवाय उप-कंत्राटदारांचा वापर करणार नाहीत आणि उप-कंत्राटदार या आचारसंहितेचे पालन करण्यासाठी लिखित स्वरुपात सहमत झाल्यानंतरच करतील.

<u>सीमाशुल्क अनुपालन</u>: पुरवठादार सर्व लागू असलेल्या सीमाशुल्क कायद्यांचे अनुपालन करतील आणि उत्पादनांचे बेकायदेशीर हस्तांतरण करण्यापासून संरक्षण करण्यासाठी कार्यक्रम स्थापन करून राखून ठेवतील.

<u>सुरक्षा</u>: एफओटीएलच्या उत्पादनांच्या शिपमेंटमध्ये पुरवठादार अप्रत्यक्ष मालवाहतुकीला (उदा. , औषधे आणि इतर निषिद्ध वस्तू) संरक्षण देण्यासाठी सुरक्षा प्रक्रिया राखतील, ज्यात युनायटेड स्टेट्सला शिपमेंटसाठीच्या दहशतवादविरोधी सीमाशुल्क-व्यापार भागीदारी (सी-टीपीएटी) आवश्यकतांचे अनुपालन समाविष्ट आहे परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही.

***<u>अंमलबजावणी आणि लागू करणे</u>***

<u>पोस्टिंगबाबत आवश्यक बाबी</u>: पुरवठादार ही आचारसंहिता सर्व कर्मचाऱ्यांना आणि परदेशी स्थलांतरित कामगारांसह प्रत्येक कर्मचाऱ्याला समजणाऱ्या भाषांमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना आणि अभ्यागतांना सहज दिसेल अशा जागी पोस्ट करतील. पुरवठादार या आचारसंहितेच्या घटकांबद्दल दरवर्षी सर्व कामगारांना कळवतील आणि प्रशिक्षित करतील.

<u>नोंद ठेवणे</u>: अनुपालनाची पडताळणी करणे शक्य होण्यासाठी पुरवठादार या आचारसंहितेच्या प्रत्येक घटकाच्या बाबतीत संपूर्ण आणि अचूक नोंदी ठेवतील.

<u>पुरवठादार मार्गदर्शक तत्त्वे; परवानाधारक सामाजिक अनुपालन पुस्तिका</u>: जेथे लागू असेल तेथे पुरवठादार, पुरवठादार मार्गदर्शक तत्त्वे आणि/किंवा परवानाधारक सामाजिक अनुपालन पुस्तिका यामध्ये तपशीलात दिलेल्या आवश्यकता पूर्ण करेल, ज्या एफओटीएलची कॉर्पोरेट वेबसाईट www.fotlinc.com येथे सापडतील.

<u>मूल्यांकने आणि सुधारात्मक कृती</u>: या आचारसंहितेच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी एफओटीएल अंतर्गत, तसेच स्वतंत्र लेखापरीक्षकांना ऑन-साईट आणि/किंवा आभासी मूल्यांकने करण्यासाठी उपयोगात आणते. पुरवठादार अशा सर्व मूल्यांकनांसह पूर्ण सहकार्य करतील आणि पुनरावलोकनासाठी उपलब्ध असलेल्या तपशीलवार अनुपालन नोंदी तयार करतील. आनानुपालनाच्या क्षेत्रांचे उचित मार्गाने निराकरण करण्यासाठी सुधारात्मक कृती योजना विकसित करण्यासाठी पुरवठादार एफओटीएलसह कार्य करतील.

उल्लंघनाबाबत अहवाल : या आचारसंहितेच्या संशयित उल्लंघनाबाबत अहवाल देण्यासाठी, FOTLच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व विभागाला +1-270-935-2588 या क्रमांकावर फोनद्वारे किंवा code@fotlinc.com तेथे इमेल द्वारे किंवा मोबाईल साधन वापरुन उजवीकडे कोड स्कॅन करुन, संपर्क साधा. कृपया सहभागी पक्ष आणि कथित उल्लंघन, समस्या थेटपणे सोडवण्यासाठी केलेले उपाय आणि चिंतेसंबंधी तुमच्याशी गोपनीयतेने संवाद साधण्यासाठी संपर्क माहिती याबाबत तपशीलात माहिती द्या. आचारसंहितेच्या उल्लंघनाचा अहवाल देणाऱ्या किंवा या आचारसंहितेच्या संभाव्य उल्लंघनांच्या संभाव्य उल्लंघनांच्या कोणत्याही अन्वेषणास कोणत्याही प्रकारे मदत करणाऱ्या किंवा त्यात सहभागी होणाऱ्या लोकांविरुद्धचा बदला आम्ही कठोरपणे प्रतिबंधित करतो. वर रूपरेषित केल्याप्रमाणे कोणत्याही बदल्याला अहवाल एफओटीएलला दिला जावा.

…सुधारित आवृत्ती फेब्रुवारी 2022